
# रंग मनाचे



**संपादिका: डॉ. माया तुळपुळे**

वर्ष : चौथे, अंक : ८वा, एप्रिल २०११

## श्वेता असोसिएशनचे मुखपत्र

# *रंग मनाचे*

कोड असणाऱ्या व्यक्तींच्या स्वमदत गटाचे संवादमाध्यम

**श्वेता असोसिएशन**

रजिस्ट्रेशन नं. महाराष्ट्र/११४४/२००१/पुणे

(स्थापना : २६ मार्च २००१)

सभासद संख्या १७७०

**वर्ष :** चौथे **अंक :** आठवा

एप्रिल २०११

**मूल्य :** रु. १५/-

**संपादक मंडळ :**

डॉ. माया तुळपुळे, अश्विनी देशपांडे, सौ. गीतांजली घायाळ

**मुद्रणस्थळ :**

परशुराम प्रोसेस,

शेड नं. १२४६/३, सर्व्हे नं. १२९/५/२,

बारांगणी मळा, वडगांव धायरी, पुणे ४११ ०४१.

दूरध्वनी : २४३९ २९०४ / २४३९ ४४०६

**पत्र व्यवहाराचा पत्ता :**

श्वेता असोसिएशन,

c/o सहवास हॉस्पिटल, २६, सहवास सोसायटी,

कर्वेनगर, पुणे ४११०५२

**दूरध्वनी :**

०२०-२५४५८७६०

email - maya.myshweta@gmail.com
deepti.myshweta@gmail.com

website - www:myshweta.org
www:nitalthefilm.com

**मुखपृष्ठ चित्रकार** : उदय पळनिटकर

*अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.*

# आमच्या इतर शाखांच्या संपर्कासाठी

## १) मुंबई - दादर

सी.पी. शहा, c/o विनित प्रॉडक्टस्, सी-४४ ३ रा मजला,
रॉयल इंडस्ट्रिअल इस्टेट, वडाळा, मुंबई ४०००३१.
फोन नं. : ०२२ २४१४९४९७, भ्रमणध्वनी : ९८३३८ ७३५३८

## २) ठाणे

सौ. रश्मी दाभोलकर / सौ. सुरेखा कलघटगी
पेन्शनर्स हॉल, घंटाळी रोड,
नौपाडा, तीन पेट्रोल पंपाजवळ, ठाणे
फोन नं. : ०२२ २५४१२०५३, भ्रमणध्वनी : ०९८६९४३४५१७

## ३) नागपूर

संध्या दंडे, 'रेव्हीअरा' शॉप नं. ९, राजकमल कमर्शिअल कॉम्प्लेक्स,
पंचशील चौक, धंतोली, नागपूर ४४००१२.
फोन नं. : ०७१२ २५६११००५, भ्रमणध्वनी ९८२२ २०४२७३

## ४) औरंगाबाद

- सौ. विदुला सुकळीकर, द्वारा-मस्ती की नयी पाठशाला,
  ७१, अंकिता अपार्टमेंट, बालाजी मंदिराजवळ, टिळक नगर, औरंगाबाद.
  भ्रमणध्वनी : ९४२३७८२८३९
- श्री. राजन सावरीकर, प्लॉट नं. १, चैतन्य नगर हाऊसिंग सोसायटी,
  एन्/७ एल्/२, कॉर्पोरेशन शाळेसमोर, सिडको, औरंगाबाद.
  भ्रमणध्वनी : ९३२६३८६८३४

## ५) कोल्हापूर

डॉ. रचना संपत कुमार,
२२३ / ई, ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६ ००३
भ्रमणध्वनी : ०९६२३१०१००९

## ६) नाशिक

डॉ. मीना मालेगावकर
यशश्री क्लिनिक : फोन नं. : ०२५३-५७७६०४, ०२५३-५७४०५१
भ्रमणध्वनी : +९१९८४५७८१३९७

## ६) बेंगलोर

रेखा उदास, माणिक पटवर्धन
फोन नं. : ०८०-२२५५५२२७ भ्रमणध्वनी : ०९८८६०४६९८७




२५ मार्च २०११ कोल्हापूर वधु-वर मेळावा 'स्वयंसिद्धा'च्या कांचन परुळेकर,
जिल्हाधिकारी रणजित देशमुख, श्री मोहन मुल्लेरकर, रोटरी गव्हर्नर



कोल्हापूर वधु-वर मेळाव्यासाठी जमलेला उपस्थित वर्ग




५ डिसेंबर २०१०
श्वेता वधु-वर मेळावा,
उद्यानप्रसाद मंगल
कार्यालय. डॉ. माया
तुळपुळे, डॉ. गिरीजा
उर्सेकर आणि दाजी
काका गाडगीळ

# संपादकीय

## *श्वेताच्या दशक पूर्तीच्या निमित्ताने ...*

२००१ साली वर्ष प्रतिपदेला ''श्वेता असोसिएशन'' या कोड असणाऱ्या व्यक्तींच्या स्वमदत गटाची स्थापना झाली. गटनिर्मिती प्रक्रियेत डॉ. माया तुळपुळे, डॉ. यशवंत तावडे आणि उर्जिता फडके यांची प्रमुख भूमिका होती. दहाजणांच्या उपस्थितीने सुरु झालेल्या या संस्थेचे आज २००० व्यक्तींच्या विशाल समुदायात रुपांतर झाले आहे. कोड असणाऱ्या व्यक्तींना एकत्र आणुन त्यांची दु:खं, समस्या सोडविण्यासाठी आणि अनुभवांची देवाण-घेवाण करण्यासाठी तसेच या विकाराची शास्त्रीय माहिती मिळवून तिचा समाजात प्रसार करण्यासाठी श्वेता असोसिएशनची स्थापना झाली. अतिशय सकारात्मक दृष्टिकोनातून निर्मिती झालेल्या या संस्थेनी कोड असणाऱ्या व्यक्तीने आपले आत्मभान परत मिळवावे, आत्मसन्मान वाढवावा आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात त्यांना सामील करुन घ्यावे अशा उद्देशाने काम सुरू केले.

डॉ. यशवंत तावडे आणि इतर त्वचारोग तज्ज्ञांच्या सहाय्याने फेब्रुवारी २००२ या वर्षी तयार केलेल्या एका प्रश्नावलीद्वारे कोड असणाऱ्या व्यक्तींची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, कौटुंबिक, जनुकीय, आहारविषयक माहिती करून घेतली जाते. तसेच पांढऱ्या डागांचा प्रकार, त्याबरोबर असणारे इतर विकार आणि औषधोपचारांची सखोल माहिती घेतली जाते. गेल्या १० वर्षात अंदाजे ८७० व्यक्तींच्या कोडविषयक माहितींचा साठा संस्थेकडे उपलब्ध आहे. संशोधकांनी याचा जरूर उपयोग करून घ्यावा अशी आमची इच्छा आहे.

मार्च २००२ पासुन समुपदेशन बैठकांना सुरवात झाली. १० व्यक्तींचा एक गट करून श्वेतामधील एखाद्या सहाध्यायी व्यक्तीने-जिने आपल्या वैगुण्यावर मात करुन आयुष्यात यशस्वी होउन दाखविले आहे, तिने गटाला मार्गदर्शन करायचे असा उपक्रम सुरू झाला. यानंतर श्वेताच्या १० व्हॉलिंटीयर्सनी (R.E.B.T.) आणि समुपदेशनाचे प्रशिक्षण घेतले. अनेक व्यक्तींना विशेषत: लहान मुलामुलींना याचा फायदा झाला. मुलांचे बंद झालेले पोहणे पुन्हा सुरू झाले, कुणाचे लांब कपडे घालण्याचे निर्बंध

उठले. कॉलेज मधील एका मुलाने तर यापुढे त्रासदायक औषधे घेणारच नाही असा खंबीर निर्णय घेतला आणि ८५ वर्षांच्या एका आजींनी २६ वर्षे लाइट थेरपी घेतल्यावर आता बास! असे ठरविले.

सप्टेंबर २००२ मध्ये वधु-वर मंडळाचे कार्य सुरू झाले. संस्थेच्या तरुण सभासदांनी आम्हाला आणि मध्यमवयीन सभासदांनी आमच्या मुला-मुलींसाठी लग्नाचा प्रश्न फार गंभीर बनला आहे अशी तक्रार केली. कित्येक मुला-मुलींचे वधु-वर मंडळातील फॉर्म आणि पैसे कोड आहे, असे लिहिल्यामुळे स्वीकारले गेले नाहीत. ही गंभीर सामाजिक समस्या लक्षात घेउन श्वेता वधु-वर मंडळाची स्थापना झाली. पुण्यातील आणि पुण्याबाहेरील शेकडो वधु-वर मंडळांशी फोन किंवा पत्राद्वारे अथवा प्रत्यक्ष भेटुन हे काम सुरु झाले. यावर्षी नोंदणीची सुविधा वेब साईटवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. वर्षातुन दोन वधु-वर मेळावे घेतले जातात. आजपर्यंत सुमारे ११००हुन अधिक व्यक्तींनी या सेवेचा फायदा घेतला आहे आणि सुमारे ४५० व्यक्तींचे विवाह जुळले आहेत.

२० डिसेंबर २००२ रोजी औरंगाबाद येथे डॉ. गुळाणीकर यांच्या पुढाकाराने औरंगाबाद शाखेची स्थापना झाली. शंभरहुन अधिक व्यक्तींची तपासणी, त्वचारोग तज्ज्ञ डॉ. यशवंत तावडे आणि डॉ. गुळाणीकर व श्वेताच्या संस्थापिका डॉ. तुळपुळे यांची भाषणे आणि डाग झाकणारी प्रसाधने यांचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. यानंतर नागपूर येथे संध्या दंडे, श्रीयुत रघुनाथ कुलकर्णी, डॉ. प्रशांत अग्निहोत्री, डॉ. संजीवनी केळकर यांच्या सहभागाने शाखा स्थापन झाली. २३ मार्च २००८ रोजी नागपुरात मेळावा घेण्यात आला. २८ आक्टोबर २००८ रोजी ठाणे येथे डॉ. किरण गोडसे, डॉ. उदय खोपकर, डॉ. तोरसेकर, डॉ. पुरोहित, डॉ. पी. सी. शहा यांच्या सहभागाने शाखेचे कामकाज सुरु झाले. जून २००७ रोजी कोल्हापूर येथे डॉ. श्री व सौ. चौगुले, सोनाली नवांगुळ, उदय कुलकर्णी यांच्या पुढाकाराने श्वेताचे काम सुरू झाले.

दिल्ली येथील (National Institute of Immunology) या संस्थेच्या डॉ. राजेश गोखले, डॉ. रजनी राणी, डॉ. शशीधरन (NCCS - Pune) यांच्या सहभागाने ज्या कुटुंबातील दोन पिढ्यांमध्ये पांढरे डाग आहेत त्यांच्या रक्तातील

जनुकीय तपासणी करण्याचे प्रोजेक्ट सुरू झाले. याच सुमारास सोलापूरचे वैद्य विक्रम पंडित आणि पुण्यातील वैद्य वैभव मेहता यांच्या सहकार्याने आयुर्वेदिक औषधे, पथ्य आणि आहार विहार यावर सुमारे ४ वर्ष अभ्यास करण्यात आला. ९० लोकांनी या प्रकल्पाचा लाभ घेतला.

कोड असलेल्या व्यक्तींना आणि सर्वसामान्य जनतेला कोड या विषयाची शास्त्रीय माहिती उपलब्ध व्हावी म्हणून 'पांढरे डाग कारणे व उपचार' ही पुस्तिका प्रकाशित करण्यात आली. याची सुधारित आवृत्ती ''कोड हा विकार नक्की आहे तरी काय?'' या नावाने यंदा प्रकाशित करण्यात आली आहे.

२००३ सालच्या मार्च-एप्रिलमधे डॉ. अनिल अवचट यांनी श्वेताला भेट दिली. संस्थेच्या कार्याची माहिती करुन घेतली. त्यानंतर सहवास हॉस्पिटलमध्ये जनरल वार्डात होणाऱ्या मासिक बैठकांना उपस्थित राहुन मार्गदर्शन केले. नारायण पेठेतील मुक्तांगण काऊन्सिलिंग केंद्राची जागा रविवारच्या बैठकांसाठी उपलब्ध करुन दिली. वधु-वर मेळाव्यांना मार्गदर्शन केले आणि ते आपणा सर्वांचे बाबा बनुन गेले. १० फेब्रुवारी २००४ रोजी ''डॉ. अनिता अवचट स्मृती संघर्ष पुरस्कार'' श्वेताच्या कार्यासाठी डॉ. माया तुळपुळे यांना ''मुक्तांगण मित्र परिवारा''तर्फे देण्यात आला. या पुरस्काराने श्वेताच्या कार्याला समाजमान्यता आणि सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झाली. त्या नंतर रोटरी तर्फे 'समाज भूषण पुरस्कार २००५' हा पुरस्कार तसेच ''मानव सेवाधर्म समिती''तर्फे २००८ सालचा पुरस्कार, महर्षी स्त्री शिक्षण संस्थेतर्फे ''बाया कर्वे पुरस्कार २०१०'' आणि ''डॉ. सौ आनंदीबाई गोपाळ जोशी पुरस्कार २०११'' हे प्राप्त झाले.

एप्रिल २००५ पासून 'नितळ' या कोड विषयक चित्रपटाची निर्मिती प्रक्रिया सुरु झाली. सुप्रसिद्ध सिने दिग्दर्शक सुमित्रा भावे, सुनिल सुकथनकर यांच्या दिग्दर्शनाखाली हा चित्रपट पूर्ण झाला. अनेक मान्यवर अभिनेत्यांनी या चित्रपटात कामे केली होती. २ फेब्रुवारी २००६ रोजी इन्फोसिस फौंडेशनच्या सुधा मूर्ती यांच्या हस्ते चित्रपट प्रदर्शित करण्यात आला. त्यांनी या चित्रपटाला भरघोस देणगी दिली. पुणे, मुंबई, ठाणे, नाशिक, नागपूर, कोल्हापूर या ठिकाणी तो प्रदर्शित झाला. भारतातील सर्व चित्रपट महोत्सवात त्याला स्थान मिळाले आणि २००६ साली सर्वोत्कृष्ट चित्रपट म्हणून

अनेक पारितोषिके मिळाली. जनमानसाला भावनिक आवाहन करून कोडविषयक मत परिवर्तनाचे आमचे उद्दिष्ट यामुळे साध्य झाले.

डिसेंबर २००७ साली ''रंग मनाचे'' हे संस्थेचे मुखपत्र षण्मासिक स्वरूपात सुरु झाले. संस्थेच्या अनेक सभासदांनी त्यांच्या अव्यक्त भावना व्यक्त केल्या. आयुकाच्या अरविंद गुप्तांसारखे संस्थेचे अनेक हितचिंतकही लेखनाद्वारे या उपक्रमात सहभागी होतात.

भारतातील त्वचारोग तज्ज्ञांनी कोड या विषयाकडे खास लक्ष देण्याचे ठरवून १९ मे ''जागतिक कोड दिन'' म्हणून २००८ साली जाहीर केला. दरवर्षी उत्साहाने हा दिवस साजरा करण्यात येतो. त्वचारोग तज्ज्ञांच्या पुढाकाराबद्दल आणि सहभागाबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

कुठल्याही सरकारी किंवा निमसरकारी अनुदानाशिवाय हे कार्य देणगीदारांच्या आर्थिक सहकार्यामुळेच पुढे नेणे शक्य झाले आहे. आम्ही देणगीदारांच्या ऋणात राहण्यातच धन्यता मानतो. या पुढेही असाच प्रतिसाद आम्हाला मिळत राहील ही अपेक्षा!

सप्टेंबर २०१० साली इटली (मिलान) येथे पहिली जागतिक कोड परिषद भरविण्यात आली होती. त्यात श्वेताचे प्रतिनिधित्व डॉ. माया तुळपुळे यांनी केले होते. या परिषदेमुळे श्वेताच्या कार्याची ओळख आंतरराष्ट्रीय स्तरावर झाली. दि. २२, २३, २४ एप्रिल २०११ रोजी भारतातील कोडविषयक परिषद बेंगलोर येथे भरविण्यात येणार आहे. या परिषदेद्वारा श्वेतासारखे कार्य भारतभर सुरु होण्यासाठी ठोस पावले उचलली जाणार आहेत. श्वेतासाठी हा सर्वोच्च सन्मान आहे, असे आम्ही समजतो.

हे कार्य तडीस नेण्यास सर्व सभासदांच्या आणि हितचिंतकांच्या संपूर्ण सहकार्याची गरज आहे. आमच्या विनंतीस मान देऊन आपण तन-मन-धनानी या देशव्यापी मोहिमेत सहभागी व्हाल याची खात्री आहे.

धन्यवाद!

– डॉ. माया तुळपुळे

एप्रिल २०११

# दिसणे महत्त्वाचे की जगणे

– सौ. अनघा ठोंबरे

संस्कृती, इतिहास, कथातून, अनुभव, अंतरंगांतून एकच निनाद येत असतो जगणे, आयुष्य, अस्तित्व, असणे हे निर्विवादपणे महत्त्वाचे आहे. दिसणे हा जगण्याचा एक भाग असतो. पशुंना जर वाचा असती तर ते म्हणाले असते, आम्हाला हे रुप नको, आम्हाला नामशेष व्हायचे नाही. चित्ता, मोर, सिंह, वाघ, लांब सुळे असणारा हत्ती ह्या सर्वांचा विनाश त्यांच्या सौंदर्याने झाला ते आता संपत आहेत, शेवटचा श्वास घेत आहेत किंवा बंदिस्त परावलंबी जीवन जगत आहेत. लोककथांमधे सुंदर शिंगे असलेल्या काळविटाची कथा प्रसिद्ध आहे. त्याची सुंदर शिंगे वेलीत अडकली व जीवन धोक्यात आले तेंव्हा सौंदर्य शाप वाटू लागले.

सौंदर्य ही काहीशी दुर्मिळ दैवी देणगी आहे पण त्याहीपेक्षा बुद्धी, कला, कौशल्य, सामर्थ्य ह्या महत्त्वाच्या दुर्मिळ देणग्या आहेत. शेवटी जीवनच नसेल तर सौंदर्याची काहीच किंमत नाही. केवळ दिसण हे तर अजिबातच महत्त्वाचे नाही. दिसणे म्हणजे केवळ रुप! शब्द, स्पर्श, रस, गंध ह्यातही सौंदर्य असते. बाह्य दिसणे हे क्षणभंगुर असते, वयानुसार, काळानुसार ते लोप पावते, सौंदर्याच्या कल्पनाही काळानुसार, व्यक्तिनुसार अगदी देशानुसार बदलतात, जीवन मात्र त्रिकालातीत जगणे, अस्तित्व असते. माणसाने इतिहासपूर्व काळापासून जगण्यासाठी संघर्ष केला आहे. सौंदर्य निश्चित तेवढे महत्त्वाचे नाही. शेवटी सुंदर दिसायचे कशाला? जगणे सुंदर व्हावे म्हणून! इतर प्राण्यांच्या तुलनेत माणूस तसा कुरूप आहे आणि भविष्यातला उत्क्रांत माणूस अधिकच कुरूप असणार आहे. त्याचे सौदर्य दिसण्यात नाही. संस्कृतमधे 'भार्या रूपवती शत्रु:' म्हटले आहे. सौंदर्यामुळे विनाशाची शक्यता असते. नार्सिसस स्वत:च्या अप्रतिम रूपाच्या प्रेमात पडला व त्याचे जीवन नष्ट झाले. इतिहासपूर्व काळतील स्त्रियांचे जीवन त्यांच्या सौंदर्यामुळे दु:खमय झाले, हजारो पद्‌मिनींना जोहार करावा लागला. 'दिसणे' पहाणाऱ्याच्या नजरेत असते मन:स्थितीवर अवलंबून असते.

प्रत्यक्षात कधी कधी जीवनापेक्षा दिसण्याला महत्त्व दिलेले दिसते. रूप नसलेल्यांच्या मनात तीव्र निराशा, दु:ख असते. रुप हे जन्मजात असते, दैवाधीन असते. त्यात व्यक्तिचे कर्तृत्व नसते. त्यामुळे आपण कमनशीबी आहोत असे त्यांना वाटते. त्यांना अनेक

नकारांना तोंड द्यावे लागते. एकटेपणाचा अभाव जाणवतो. तीव्र उपेक्षा, कुचेष्टा, अपमान, हेटाळणीच्या नजरा ह्यांना सामोरे जावे लागते. हे लोक पराभूत, निराश, उदास मन:स्थितीत जीवन घालवतात. सौंदर्याच्या मृगजळामागे धावतात त्यासाठी मेकअप पासून कॉस्मॅटिक सर्जरीपर्यंत कशाचाही आधार घेतात. पैसा, मनस्ताप, वेळ सर्व खर्च होते. स्वत:ला काही फक्त दिसण्यातून व्यक्त करता येत नाही. विचार, आचरण, संस्कार स्वभाव, सवयी ह्यातून माणूस व्यक्त होतो तो सुंदर असू शकतो. सौंदर्य क्षणभंगुर पण कर्तृत्व अमर असते. मृत्युनंतरही जिवंत राहते. इसाप अत्यंत कुरूप होता, पण जगावर त्याने अनंत उपकार केले. लिंकन कुरूप होता त्याने ऐतिहासिक कार्य केले. स्वत:च्या कुरूपतेवर त्याने केलेले विनोद अत्यंत मार्मिक आहेत. त्याचे जीवनाशी नाते घट्ट होते. दिसणे दुसऱ्यांसाठी असते जगणे स्वत:साठी. कुरूप माणूस जर अंतरंगात डोकावू लागला तर ते कुरूप, वेडे पिल्लू नसून राजहंस असल्याचा साक्षात्कार होतो. कुरूप माणूस जर रूपाचाच विचार करत राहिला तर एकटा पडतो, जीवनाचा विचार केला तर जगाला आदरणीय ठरतो. चेहरा म्हणजे जीवन नाही. दिसणं स्वीकारून जगणं सुंदर करायचे अनेक मार्ग आहेत.

आईला आपले बाळ सुंदर वाटते आणि बाळाला आई. सौंदर्य निष्पाप बाल्यात, तडफडणाऱ्या तारुण्यात, शौर्यात, वृद्ध सुरकुतलेल्या हातातही असते. सौंदर्य निर्मळ हृदयात, वात्सल्यात, प्रेमात, राबणाऱ्या हातांमधे असते. ऊस वेडावाकडा कुरूप असतो त्याला महत्त्व नाही. आतल्या जीवनमय रसाला आहे. सुरेल संगीत, सुंदर चित्र सर्वांमुळे जीवन बनते. जगण्यासाठी सुखदायक दिसणं असते. जीवन अनुभवांची साखळी असते भावनांचे रेशमीबंध असतात. जगण्यात समर्पण त्याग, परोपकार असतो. जगण्यात सुखदु:ख असते, जगणे एक कलाकौशल्य आहे. त्यात ज्ञान, श्रद्धा कर्माचा संगम आहे. जगण्यात बांधिलकी नाती, विश्वास, जिव्हाळा आस्था असते, जगण्यात सहनशीलता, समजुतदारपणा, सहानुभूती, दया असते, मानवता, सहृदयता असते. जगणे म्हणजे झुंजणे, झगडणे, निर्णय घेणे, प्रयत्न करणे स्वीकारणे असते. प्रतिकार करणे, माफ करणे, रक्षण करणे म्हणजे जीवन आहे. प्रेरणा, स्फुर्ती, साक्षात्कारही जीवन आहे. जगणे हा वर्षांचा, श्वासांचा हिशेब नाही 'आहारनिद्रा भयमैथुनम्'च्या पलिकडे जगणे हे भव्य दिव्य असते इतक्या गूढ अर्थपूर्ण जीवनाची दिसण्याशी तुलना करणेही अशक्य आहे.

जर दिसणे महत्त्वाचे असते तर माणूस गेल्यावर कोणी टाहो फोडला नसता. पुतळे,

चित्रे, सुंदर फोटोंवर माणूस प्रसन्न राहिला असता. ताजमहाल सुंदर आहे, मोर सुंदर असतो म्हणून मला ताजमहाल, मोर करा असे कुणी म्हणत नाही. मिडास राजाने जीवनापेक्षा दिसण्याला 'सुंदर सोन्याला' महत्त्व दिले, स्वत:ची मुलगी प्राणहीन सोन्याची झाल्यावर ढसाढसा रडला. शेवटी दिसणे असण्यासाठी असते. फुले सुंदर दिसतात कारण त्यांना फळात, बीजात रूपांतरित होऊन जगायचे असते, त्यासाठी पाखरांना आकर्षित करायचे असते, जीवनप्रवाह चालू ठेवायचा असतो. दिसणे हा फक्त वरचा रंग, मुलामा असतो ते वरवरचे असते. आता तर मेकअपच्या जमान्यात सर्वच अप्सरा आणि सगळेच मदनांचे पुतळे. दिसण्यापेक्षा महत्त्वाची असते तपस्या, त्याग. मधाच्या पोळ्यात जीवन असते ती सुंदर नसतात, कोळ्याची जाळी सुंदर असतात त्यात जीवन नसते, मरण असते. मोर सुंदर पिसारा फुलवून नाचतो कारण त्याला मादीला आकर्षित करून जीवनप्रवाह चालू ठेवायचा असतो. दिसणे भुरळ पाडते, मोहात पाडते, जीवनाचा विनाश करु शकते आणि जीवन एकदाच मिळते, ते नाही तर काहीच नाही म्हणून सावध रहावे लागते. कुरूपामागे सुंदर उदार मन असू शकते, कुरूपच काय अपंग व्यक्ती जीवनपूर्ण असेल तर सुंदर असू शकते. सौंदर्यस्पर्धा होतात, त्यामागे राजकारण, स्पर्धा, पैसा, व्यापार असतो. शेवटी जीवन असते माणूस सौंदर्यासाठी वेडा असतो पण जीवनाइतके सुंदर काहीही नाही. जगण्यामागे तत्त्वज्ञान, भूत, भविष्य असते. सौंदर्यामागे अहंकार, उन्मत्तपणा असतो.

जीवन मोठा पुरस्कार आहे. निसर्ग नुसता सुंदर नसतो तो जीवन देतो तो उदात्त, उदार असतो सर्वस्व देऊन जगवणारा असतो. शेवटी त्याचेही नाते जगण्याशी असते. पृथ्वी, आप, तेज, वायु आकाश सर्व सुंदर आहेत त्यापेक्षा ते सर्व जीवनदायक आहेत. दुरून जे सुंदर दिसते ते अनेकदा सुंदर नसते काट्याकुट्यांनी भरलेले असते.

मध्यंतरी एक बातमी वाचली. एका कॉलेजकन्येला मैत्रिणींनी काळी, जाडी चिडवले म्हणून तिने आत्महत्या केली. एक सुंदर जीवन संपवलेच आणि आईवडिलांना अपार दु:ख दिले.

सौंदर्य आईच्या प्रेमळ हृदयात असते, राबणाऱ्या हातात असते, महात्म्याच्या निर्मळ हास्यात असते, साहसी प्रयत्नात व कृतीत, साहित्यात असते. भुकेलेल्याला भाकरीचा तुकडा सुंदर वाटतो कारण तो जीवन देतो. सौंदर्याचे रसग्रहण जीवनावर अवलंबून आहे. मृतांना सौंदर्याचा काय उपयोग! सौंदर्य घातक प्राणघातक असू शकते.

समजा परमेश्वर प्रसन्न झाला त्याने विचारले सुंदर जीवन हवे का सुंदर रूप हवे? तर सर्वांचे उत्तर सुंदर जीवन हेच असेल. सुंदर सोन्याची सुरी कुणी उरात खुपसून घेत नाही, सुंदर हिरा खाऊन कुणी जीव देत नाही. दिसण्याला मर्यादित महत्त्व आहे, असण्याला अमर्याद महत्त्व आहे. जगणे सुंदर झाले की दिसणेही सुंदर होत जाते. आकृती, रंग, रुपाच्या पलिकडे जीवन असते. सौंदर्यापेक्षा जीवनाचा इतिहास जास्त रोमांचकारी आहे.

जीवन आहे तर दिसणे आहे. दिसण्याला असण्यापेक्षा कधीही मोठे करता कामा नये. एक क्षणिक आभास आहे तर दुसरे चिरंतन सत्य आहे.

## – आमचे देणगीदार –

(सप्टेंबर २०१० ते मार्च २०११)

२४.३.२०१० : सौ. ज्योती कैलास चाटी यांजकडून
कै. सौ. कुसुम पांडे यांचे स्मरणार्थ देणगी रु. ५०००/-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | ५/१२/२०१० | नागेश माधव ऋषी, पुणे | १०००/- |
| २) | ५/१२/२०१० | दाजीकाका गाडगीळ, पुणे | १०,०००/- |
| ३) | ५/१२/२०१० | आशाताई गाडगीळ, पुणे | ३०००/- |
| ४) | ८/१२/२०१० | श्रीकांत वाठारे, सातारा | १०००/- |
| ५) | ९/१२/२०१० | संजीवनी कर्वे, पुणे | २५०/- |
| ६) | १४/१२/२०१० | रमेश कुकडे, पुणे | १०००/- |
| ७) | २०/१२/२०१० | डॉ. माया तुळपुळे, पुणे (बाया कर्वे पुरस्कार) | ५१,०००/- |
| ८) | ७/१/२०११ | विमल कुलकर्णी, तळेगाव-दाभाडे | २०००/- |
| ९) | २१/१/२०११ | आशाताई जावडेकर, पुणे | ५०००/- |
| १०) | २४/१/२०११ | श्रीकांत निबंधे, ठाणे | ११,०००/- |
| ११) | ९/२/२०११ | सुधाकर कृष्णाजी तासगावकर, पुणे | १०००/- |
| १२) | २४/३/२०११ | नलिनी महाजनी, मुंबई | २५०/- |
| १३) | २५/३/२०११ | कुमुदिनी नगरकर, निगडी | २०,०००/- |

***आम्ही आपले कृतज्ञ आहोत.***

# अहवाल

१)  २४ ऑक्टोबर २०१० रविवार सहवास सभागृह कर्वेगर येथे सकाळी ९.३० ते ४ या वेळात रूग्ण-पालक कार्यशाळा आयोजित केली होती. त्याचे उद्‌घाटन आयुकाचे श्री. अरविंद गुप्ता यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात झाले. यामध्ये डॉ. धनश्री भिडे, डॉ. अनुराधा पाटील, डॉ. कौमुदी गोडबोले, डॉ. शिरीषा साठे, डॉ. ज्योत्स्ना पडळकर आणि सौ. सुजला वाटवे यांनी कोड, कोडाची आनुवंशिकता, कारणे, उपचार, लग्न समस्या, सुयोग्य पालकत्व, मन, वृत्ती आणि विकार यासंबधी समुपदेशन केले. सर्व लोकांकडून या कार्यक्रमाला उत्तम प्रतिसाद मिळाला.

२)  २६ नोव्हेंबर २०१० रोजी कमिन्स अभियांत्रिकी महिला महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये खासदार माननीय सुमित्रा महाजन यांच्या हस्ते सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल डॉ. माया तुळपुळे यांना २०१०चा ‘बाया कर्वे’ पुरस्कार, ५१ हजार रोख आणि मानचिन्ह देऊन सन्मानित केले. त्या वेळी डॉ. माया तुळपुळे म्हणाल्या, ‘‘लग्न जमवताना कर्करोग, मधुमेह, एडस् यांची चाचणी होणे गरजेचे असुन ती चाचणी होत नाही. परंतु कोड असणाऱ्या व्यक्तीचे कोड दिसते म्हणून त्याला विरोध केला जातो. कोड हा आजार नसून विकार आहे. त्यामुळे समाजाच्या मानसिकतेत बदल होणे गरजेचे आहे’’.

३)  २७ नोव्हेंबर २०१० रोजी ‘इंडियन रेड क्रॉस सोसायटी’ तर्फे रास्ता पेठ पुणे येथील वाय.एम.सी.ए. येथे ‘स्वाइन फ्लू’ $H_1N_1$ ह्या विषयी जनजागृती साठी एक परिचर्चा आयोजित करण्यात आली होती. श्वेता असोसिएशनचे सभासद संगीता कोऱ्हाले, अश्विनी देशपांडे, रंजना पुरोहित, सुवर्णा कर्लेकर, गीता वसंतगडकर ह्यांनी बाल वयापासून ते वृद्धांपर्यंत हा आजार कसा परिणाम करतो व त्यावर काळजी कुठल्या स्वरुपात घ्यावी हे छोट्या छोट्या नाटिकांद्वारे सादर करुन दाखविले.

संस्थेच्या संचालिका डॉ. माया तुळपुळे ह्यांनी पॉवर फॉईंट प्रझेंटेशनने स्वाईन फ्लूची माहिती दिली व हा रोग कसा पसरू नये म्हणून कशी काळजी घ्यावी हे सांगितले. तसेच श्वेता असोसिएशनच्या कार्याची माहिती उपस्थितांना करून देण्यात आली.

४)  ४ डिसेंबर २०१० कर्वे रस्त्यावरील अश्वमेघ सभागृहामध्ये ‘वंचित विकास’ या संस्थेला २५ वर्षे पूर्ण झाली. या आनंदसोहळ्यात श्वेता असोसिएशनच्या डॉ. माया तुळपुळे आणि अश्विनी देशपांडे सहभागी झाल्या.

५) ५ डिसेंबर २०१० रोजी संस्थेचा १२वा वधु-वर मेळावा उद्यानप्रसाद मंगल कार्यालय, पुणे येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. पुण्यातील पु.ना. गाडगीळ पेढीचे ज्येष्ठ संचालक श्री. दाजीकाका गाडगीळ यांच्या हस्ते 'रंग मनाचे' या श्वेताच्या मासिकाच्या चौथ्या वर्षाच्या सातव्या अंकाचे प्रकाशन झाले. या प्रसंगी दाजीकाकांनी, ''मी 'रंग मनाचे' मधील कथा वाचून व्याकूळ झालो असे सांगितले. आपल्या दु:खाचे भांडवल न करता खंबीरपणे वाटचाल सुरु ठेवावी. कोडाबद्दल समाजात जागृती होणे आवश्यक आहे तसेच समाजानी अशा व्यक्तींना सामावून घेतले पाहिजे,''असे आवाहन केले व श्वेताच्या सर्व उपक्रमांना माझा पाठिंबा राहील असे आश्वासन दिले. याप्रसंगी श्वेताचे वधु-वर मंडळ वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले. या उपक्रमाचे उद्घाटन सुप्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. गिरीजा उर्सेकर यांनी केले. उपस्थित पालक आणि इच्छुक मुला-मुलींना मार्गदर्शन करताना विवाह ठरविताना वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, धार्मिक, वैद्यकीय दृष्टीकोनातून विचार व्हावा. पालकांनी आपल्या इच्छा मुलांवर लादू नयेत. त्यांनी पाठीशी राहुन मार्गदर्शन करावे असे प्रतिपादन केले.

या मेळाव्यात सुमारे ८५ मुला-मुलींनी भाग घेतला. पुण्याव्यतिरिक्त जयसिंगपूर, सातारा, मुंबई, सोलापूर, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती इ. अनेक गावाहुन मुले व पालक उपस्थितीत होते. ७-८ जणांचे विवाह ठरण्याच्या मार्गावर आहेत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन संजीवनी कर्वे यांनी केले आणि वधु-वर मेळाव्याचे संचालन अश्विनी देशपांडे यांनी केले. गौरी दामले यांनी आभार प्रदर्शन केले.

६) ७ डिसेंबर २०१० डॉ. माया तुळपुळे यांची I. B. N. लोकमत चॅनेलवर मुलाखत झाली.

७) ५ जानेवारी २०१० वाई येथील स्त्री शिक्षण संस्थेच्या स्नेहसंमेलनाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. माया तुळपुळे उपस्थित होत्या. संस्थेला ''नितळ''चित्रपटाची सी.डी. भेट देण्यात आली. संस्थेनी सर्व वर्गातील मुलींना चित्रपट दाखविला.

८) डॉ. माया तुळपुळे यांचे कर्वे इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्स येथे १७ जाने. २०११ला ''श्वेता असोसिएशन स्वमदत गटाचे अनुभव'' या विषयावर लेक्चर झाले.

९) ४ फेब्रु. २०११ रोजी सकाळी ७ वा. लोकमान्य हास्ययोग संघाच्या ११व्या वर्धापनदिना निमित्त प्रमुख पाहुण्या म्हणुन डॉ. माया तुळपुळे यांनी सुमारे सव्वाशे जेष्ठ नागरिकांना मार्गदर्शन केले. जेष्ठांच्या विविध वैद्यकीय समस्यांची माहिती सांगून Quality of Life जपण्या करिता जपान आणि केरळ येथे जेष्ठ नागरिकांसाठी सुरू

असलेल्या प्रकल्पांची माहिती दिली. तसेच जेष्ठांनी घ्यावयाची शारिरीक, मानसिक आणि आहार विषयक काळजी आणि स्वसंरक्षण याबाबत मार्गदर्शन केले. या प्रसंगी हास्ययोगाचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्वेता असोसिएशनच्या विविध उपक्रमांची व हा स्वमदत गट सुरू करण्यामागे असलेल्या कारणमीमांसेची माहिती दिली.

सौ. विद्या कुलकर्णी यांनी एक उत्स्फुर्त कविता करुन वाचुन दाखविली. हास्ययोग संघाने दिलेल्या मानधनांत रु. ५०१ची भर घालून डॉ. तुळपुळे यांनी लोकमान्य हास्ययोगसंघाला देणगी दिली.

१०) ५ फेब्रु. २०११ ला 'मिळून साऱ्याजणी'च्या वर्धापन दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात डॉ. गिरीश कर्नाड यांची भेट डॉ. माया तुळपुळे यांनी घेतली. त्यावेळी डॉ. गिरीश कर्नाड यांनी डॉ. तुळपुळे यांनी प्रस्तुत केलेला ''नितळ'' हा चित्रपट पाहिल्याचे व तो आवडल्याचे आवर्जुन सांगितले.

११) २५ फेब्रु. २०११ संध्याकाळी ६वा. 'गोवर्धन मंगल कार्यालय' शनिवार पेठ, पुणे येथे झालेल्या सभेत श्रीमती सुशिलाबाई दिनकर गोडबोले ट्रस्ट आणि भारतीय इतिहास संकलन समिती महाराष्ट्र यांच्यातर्फे डॉ. सौ. आनंदीबाई गोपाळ जोशी पुरस्कार देण्यात आला. गेली १३ वर्षे आनंदीबाईच्या पुण्यस्मरणार्थ त्यांच्या मृत्युदिनी २६ फेब्रु. रोजी हा पुरस्कार देण्यात येतो. डॉ. माया तुळपुळे, डॉ. शमिया सय्यद (येरवडा झोपडपट्टीत ४० बचत गट चालवतात) डॉ. साठे (संस्कृत विश्वकोष निर्मिती– डेक्कन एज्युकेशन सोसायटी, एक कोटी नव्वद लाख शब्द आजपर्यंत तयार झालेत.) डॉ. दातार यांना वेद आणि उपनिषद यांच्या अभ्यासाबद्दल हा पुरस्कार देण्यात आला.

पुरस्कारार्थींच्या वतीने डॉ. माया तुळपुळे यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य अनिरुद्ध देशपांडे आणि डॉ. सौ. सहस्त्रबुद्धे अनुक्रमे अध्यक्ष आणि प्रमुख पाहुण्या म्हणुन उपस्थित होते.

आनंदीबाईंची प्रतिमा, शाल आणि भारतीय इतिहास संकलन समितीने प्रसिद्ध केलेले आनंदीबाईंचे पुस्तक व पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरुप होते. ह्याप्रसंगी गोडबोले ट्रस्टतर्फे ७५ हजार रुपयांचे धनादेश गरजुंना वितरण करण्यात आले.

१२) ६ मार्च २०११ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त प्रजापिता ब्रह्मकुमारी विश्वविद्यालय व स्वास्थ्य ग्रुपच्या वतीने 'नारी तुझे सलाम' या कार्यक्रमांत महिलांच्या

सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुण्या म्हणून प्रतिभा मोडक, बी.के. सरिता, डॉ. देवेंद्र शिरोळे, डॉ. दिलीप घुले, डॉ. मधुसुदन झंवर उपस्थित होते.

या वेळी डॉ. रेणू भारद्वाज (प्रशासकीय), डॉ. विद्या येरवडेकर (शैक्षणिक), शर्वरी जेमिनीस (कला), सुषमा चोरडिया (सामाजिक), चैत्राली चांदोरकर (पत्रकारिता), वृषाली मेहेंदळे (क्रीडा), डॉ. माया तुळपुळे (वैद्यकीय) यांना गौरवचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

१३) २७ मार्च २०११ रोजी कोल्हापूरमध्ये श्वेता वधु-वर मेळावा आयोजित केला. त्यात सुमारे ८५ वधु-वरांनी नांव नोंदणी केली. मेळाव्याचे उद्‌घाटन जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली. यावेळी स्वंयसिद्धाच्या संचालिका कांचनताई परुळेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. रोटरीचे गव्हर्नर श्री. मोहन मुल्लेरकर यांनी या प्रसंगी मार्गदर्शन केले.

यावेळी उपस्थित वधु-वरांनी आपली ओळख करुन दिली. कार्यक्रमास डॉ. सावनी चौगुले, डॉ. आर.आर. चौगुले, डॉ. रचना संपत कुमार आदींची उपस्थिती होती. सूत्र संचालन जयश्री साबळे यांनी केले. मंदार ओक यांनी आभार मानले. मेळाव्यादरम्यान कोडाविषयी वैज्ञानिक माहिती देणारे पुस्तक ''कोड हा विकार नक्की आहे तरी काय?'' प्रकाशित करण्यात आले.


## *श्वेता वधुवर मंडळ - एक यशस्वी उपक्रम*

भारतात प्रथमच कोड असणारी मुले व मुली किंवा ज्यांच्या आई-वडिलांना आणि नातेवाईकांना कोड आहे अशांसाठी काम करणारे विवाह विषयक सहायता केंद्र! कमी अधिक इतर व्यंगांची स्थळे आणि अशा मुला-मुलींशी लग्न करु इच्छिणाऱ्यांची ही नोंदणी होईल.

एकूण १०७५ स्थळांची नोंदणी आहे. ४६० मुलामुलींची लग्ने झाली. संपूर्ण बायोडाटा पोस्टकार्ड आकाराचा रंगीत फोटो व अपेक्षा अशा माहितीसह संस्थेच्या कार्यालयात नोंदणी करावी.

पत्ता : **श्वेता असोसिएशन**
२६, सहवास सोसायटी, कर्वेनगर, पुणे ४११०५२
दूरध्वनी : ०२०-२५४५८७६०
वेळ : सकाळी ११ ते दुपारी ५

✍

# बालपणीचे प्रताप

– जयश्री साबळे

असं म्हणतात की ‘‘बालपणीचा काळ सुखाचा’’! पण आमचा बालपणीचा काळ सुखाचा होता की नवीनच काही प्रताप करून दाखवायचा होता याचा विचार केला की मी आजही गोंधळात पडते. आमचं गांव तसं खेडंच. पण घरामध्ये सर्व सुशिक्षित व नोकरदार होते. घरी शेतीवाडीही भरपूर होती. तीस चाळीस घरे मिळुन आमचा मळा बनलेला. मळ्यामध्ये चौथीपर्यंत शाळा आणि पुढे पाचवी ते बारावीपर्यंत गावात शाळा होती. घरामध्ये आम्ही चुलत बहीणभाऊ मिळून दहाजण होतो. घरामध्ये व शेतामध्ये काम खूप असल्याने फारसं आमच्याकडे कोणाचं लक्ष नसायचं म्हणजे तुलनेत आज जी काळजी घेतली जाते तितकी नाही. पण एक मात्र होते की एकजण अभ्यासाला बसला की आम्ही सर्वजण अभ्यासाला बसायचो. शाळेतून घरी आल्यावर घरातीलही थोडीफार कामे करावी लागायची. सुट्टीच्या दिवशी शेतातही आमचे काका काम करायला सर्वांना घेउन जात असत. तेव्हा आम्ही शेवंतीची फुलं, मोसंब्या, झेंडुची फुलं तोडायला जायचो. पण सर्वजण एकत्र मिळुन काम करायचो, अभ्यास करायचो, खूप मजा यायची.

असच एक दिवस मी आणि माझे दोन भाऊ गणेश, माणिक शेतामध्ये गेलेलो. आमचं वय त्यावेळेला आठ, नऊच्या आसपास असावं. माझे काका शेत नांगरत होते. दुसऱ्या शेताच्या कोपऱ्यावर एरंडाचे झाड होते. आम्ही तिघांनीही एरंड खायला सुरवात केली. काकांनी आम्हाला पाहिलं आणि म्हणाले ‘‘खा खा शेंगदाणे आहेत ते’’ खरं तर ते चेष्टेने म्हणाले आणि नंतर त्यांनी आमच्याकडे लक्षच दिलं नाही. ते दुसरे शेत नांगरण्यासाठी निघुन गेले. आम्हाला एरंडाची चवही गोडसर लागत होती आणि म्हणुनच एरंड्याना शेंगदाणे समजुन खाण्याचा जो सपाटा लावलाय त्याचं काय विचारुच नका. थोड्याच वेळानंतर तिघांनाही प्रचंड उलट्यांचा त्रास सुरु झाला. त्यात माझी अवस्था तर फारच बिकट झालेली. म्हणजे अक्षरश: मरणाच्या दारातुन मी परत आले. तोपर्यंत डॉक्टर घरी बोलाविलेले होतेच. अशा प्रकारे शेंगदाणे सर्वांनाच फार महागात पडले.

असेच काही ना काही आमचे प्रताप चालु असायचे. एका वर्षी खूप दुष्काळ पडलेला. लोकांना पिण्याच्या पाण्याची पंचाईत. आमच्या गावाला बुधवार हा मार्केट डे असतो. एप्रिलचा महिना होता. मळ्यातच एक कि.मी. अंतरावर एक सार्वजनिक

विहीर होती. भर दुपारची वेळ होती. बुधवार होता. आम्ही घरी चौघेजण बहीणभाऊ होतो. साधारण त्यावेळी चौथी पाचवीच्या वर्गात शिकत असू. आजी बाजारामध्ये जायची. शेतातली माळवं पण असायची विकायला. आमच्या मळ्यात शिंदे आणि साबळे आडनावाची लोकं होती. जनावरांचा खायचा जो वाळलेला चारा होता त्याला कडबा म्हणतात. तो वाळलेला कडबा एकावर एक रचून ठेवलेला होता. त्याच्या जवळपास हजार बाराशे पेंढ्या असाव्यात. रचून ठवलेल्या पेंढ्यांच्याकडेने वाळलेला पालापाचोळा पसरलेला होता. आमच्या कोणाच्या डोक्यात काय लहर आली देव जाणे. घरामध्ये दरवाजाच्या वरती माचिस ठेवलेली होती. मी दारावरती चढुन ती काडेपटी घेतली आणि आम्ही चौघे मिळुन ज्या ठिकाणी कडबा रचला होता त्याच्या थोडेसे बाजूला जाऊन थोडासा पाचोळा जमा केला आणि त्याला आम्ही काडी लावून दिली. मग काय विचारता एका क्षणांत जाळ रचुन ठेवलेल्या  पेंढ्यांना पोहोचला. त्यातही सुरवातीला आम्ही माती टाकण्याचा प्रयत्न केला आणि क्षणातच दिसणारा प्रचंड जाळ, धूर बघुन चौघांनीही मोठ्यामोठ्याने रडायला सुरुवात केली. तोपर्यंत मळ्यातली लोक जमा झाली होतीच. बाजारातील लोक म्हणत होती साबळे मळ्यात काहीतरी झालय. खुपच धूर दिसतोय आणि साऱ्या बाजारातील लोक आमच्या मळ्याकडे चालून येत होती.

थोड्याच वेळात माणसांची प्रचंड गर्दी झालेली. वारा प्रचंड सुटलेला होता. जवळच लागुन शिंदे लोकांची छपराची घरे होती त्यामुळे लोक ही अधिकच घाबरलेली होती. तोपर्यंत काही लोकांनी विहीरीवरुन पाईप जोडून पाण्याची व्यवस्था केली होती आणि प्रत्येकजण आपापल्या परीने तो जाळ विझवण्याचा प्रयत्न करत होता. पण शेवटी ह्या ठिकाणी फक्त राखच शिल्लक राहीली. आजही कधी कधी तो किस्सा आठवला की घरचे म्हणतात ह्यानंतर आजपर्यंत शेतामधुन एवढा कडबा कधी निघालाच नाही. त्या वेळी आम्ही फक्त मोठ्यामोठ्याने रडत होतो. आमच्या मळ्यात त्या वेळेला रंगुबाई नावाची एक म्हातारी आजी रहात होती. आम्ही चौघेही रडत रडत तिच्या घरी गेलो. मग आमच्याच काकांनी आम्हाला आता रडु नका असं सांगितलं आणि मग आम्ही रडायचो गप्प झालो.

असे बरेच किस्से होते छोटे मोठे. पण हे दोन किस्से आठवले की आज मात्र हसायला येते आणि वाटतं की आपण इतके वेडे कसे होतो! विश्वासच बसत नाही.

## Vitiligo

**Ruby**

I look at my arms and see a poison covering me
sneaking up where everyone can see
why is this happening to me?
        my mom says I'm special
        I say I'm a freak
        I'm tired of seeing it week after week
Sometimes when I'm happy
I forget for a minute that it's covering me
and then some nosey person reminds me
        why nosey person did you remind me?
        What happened to you?
        You got a bad sunburn?
        Were you in a fire?
Why would you ask me such a question?
Would you ask a one legged girl where was her other leg?
No way, that would be evil, considered mean
        The worst are innocent little children
        just wondering, confused by this strange looking person
        they feel they have to know a reason
but I guess they are just human beings
wondering, nosey not understanding
the depression they are handing me
        on a platter in front of my face
        serving up sadness from a lonely place
        one  you can only know if you slowly watch your skin go
go away turn this awful white
when you would rather go out at night
so no one will see the bright white
        the feeling of being the only one in jeans 24-7
        is not exactly my kind of heaven
        hot and sweaty with these long pants
just so no one gets a glance
I wish I could know why this happened to me
to press magic button and be set free
        to look in the mirror and only see me
        people say it doesn't matter if you're black or white
they mean race I mean skin color
it doesn't matter if you're one or the other
but how about both, right next to each other.

## Vitiligo

**Arvind Gupta**

Skipping a few breathes
the sweat trickles down the neck
down the cleavage
and onto the midrib
it dries up fast before it goes further

the salt remains
like the patch of vitiligo
white on brown skin

aesthetically speaking
it is appealing
this combination of colours.......
not the white
not the brown
but the two together

not for long though
till one over powers the other
and there you are then
either brown
or white

## You Go

You came into my life,
was there a reason?
Wherever Emily goes, you go,
you pesky vitiligo.

One day it will be just her,
healthy through and through.
Slowly you'll leave her,
until the day that you're gone.

I won't miss you a bit.
I won't see you again,
you pesky vitiligo. One day I will say,
vitiligo, where did you go?

Was there a reason that you left?
We made many changes,
which one worked?
You are a puzzle, vitiligo.




वंचित विकास व जाणीव संघटना पुरस्कार



'श्वेता'चा दहावा वर्धापन दिन १० एप्रिल २०११

## प्राक्तन

– सौ. अर्चना सुरेश देशपांडे

आठ मार्च जागतिक महिलादिन. समाजासाठीं आयुष्य वेचणाऱ्या मातांच्या कौतुक समारंभ सोहळ्यासाठी गेले होते. अनेक जणींचे कौतुक करतांना एका व्यक्तीचे नांव परिचयाचे वाटले. कार्यक्रम संपताच बाहेर आले. तेवढ्यात गर्दीतून वाट काढत एक महिला पुढें आली 'ओळखलं का मला? मी निर्मला रानडे' हे शब्द ऐकताच माझ्या स्मृती जागृत झाल्या नि मन भूतकाळात पोचले.

मी शाळेत शिकत असतांना रानडे आमच्या समोरील वाड्यात रहायला आले. ते एका कंपनीत कॅशिअर म्हणून काम करत होते. त्यांचे एकुलते एक कन्या रत्न; नाव निर्मला. नावाप्रमाणेच निर्मल आणि संस्कारक्षम मुलगी होती. मध्यम वर्गात जन्मलेल्या मुलीप्रमाणे तिचे बालपण लाडाकोडात गेलं. तिच्या घरी लक्ष्मीची असीम कृपा नसली तरी तिच्यावर सरस्वतीची अपार कृपादृष्टी होती. आम्ही दोघी एकाच शाळेत, एकाच वर्गात शिकत होतो. परीक्षा संपली होती. छानपैकी हुंदडणं चालू होतं. सगळं काही छान चाललं होतं. माणूस ठरवतो एक आणि नियती घडवते दुसरंच. अशावेळी आपण तिच्या हातातलं खेळणं बनतो. फुलपांखरी दिवस भुर्रकन उडून गेले आणि काळाकुट्ट दिवस उजाडला. ऑफिसमधून घरी परतत असतांना निर्मलाच्या वडिलांच्या स्कुटरला बसचा धक्का लागला आणि त्याचक्षणी त्यांचा प्राण गेला.

निर्मलाच्या आईवर दु:खाचा डोंगर कोसळला. पै–पाहुणे आले आणि सांत्वन करून निघून गेले.'आई, बाबा कुठे आहेत? घरी केव्हा येणार' असे प्रश्न निर्मला आईला, राधाबाईंना विचारून भंडावून सोडी.

दु:ख विसरण्यासाठी राधाबाई निर्मलाला घेऊन माहेरी गेल्या. आधीच थकलेले आईवडिल तिच्या दु:खाने खचून गेले होते. भाऊ–भावजयीने चार दिवस विचारपूस केली पण नंतर मात्र माहेरी आलेली बहिण भावाला जड वाटू लागली. त्यांच्या वागण्यातील फरक लक्षात येताच स्वाभिमानी राधाबाईंनी आपल्या घरी परतण्याचा निर्णय घेतला.

निर्मलाला घेऊन घरी आल्यावर पुढे संसार कसा चालवायचा हा प्रश्न होता. पुरेसे शिक्षण नसल्यामुळे हातात पोळपाट लाटणे घेण्याशिवाय पर्याय नव्हता. आमच्या समोरील घर सोडून चाळीत एका खोलीत त्यांनी संसार मांडला. निर्मला आपले

बालपण विसरून एकदम प्रौढ झाली. जेवढी जमेल तेवढी आईला मदत करत होती. ती आपला अभ्यास एकाग्रतेने करत होती. तिची हुषारी पाहून शाळेच्या मुख्याध्यापकांनी तिच्या शिक्षणाची जबाबदारी स्वत:वर घेतली. दहावीच्या परीक्षेत निर्मला शाळेत पहिली आली. शाळेत तिचा कौतुक समारंभ आयोजित केला गेला. आम्ही सर्व मैत्रिणींनी व शाळेने तिला पाच हजाराचा धनादेश दिला. तो स्वीकारताना तिच्या डोळ्यात अश्रू आले. ती म्हणाली, ''या यशामागे माझ्या आईचे हात आणि तुम्हा सर्वांच्या शुभेच्छा आहेत'' ते ऐकून राधाबाईंच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले. त्यांना आपले जीवन कृतकृत्य झाल्याचे समाधान मिळाले.

निर्मलाने एका छोट्या कंपनीत पार्टटाईम नोकरी धरली. नोकरी करता करता ती कॉलेज शिक्षण घेत होती. निरंजन व निर्मला एकाच वर्गात शिकत होते. अभ्यास करण्याच्या निमित्ताने एकत्र आले. कॉलेजच्या स्नेहसंमेलनात नाटकात काम करतांना एकमेकांजवळ आले. त्यातूनच जवळीक निर्माण झाली आणि निरंजन निर्मलाच्या प्रेमात पडला.

निरंजन मोहनराव पेंडसे यांचा मुलगा. कोकणस्थी गोरा रंग, उंचापुरा पाहताच छाप पडावी असे व्यक्तिमत्त्व. मोहनराव नामांकित वकील होते. त्याच्या पत्नी उर्मिला ज्युनिअर कॉलेजमध्ये व्याख्याता म्हणून काम करीत होत्या. एकंदरीत उच्चशिक्षित व सुसंस्कृत कुटुंब होते.

निरंजन, निर्मला एकामेकात गुंतत चालले होते. निर्मला कॉलेज, नोकरी सांभाळून संध्याकाळी आईला होईल तेवढी मदत करत होती. तिची ओढाताण पाहून आई म्हणे, 'अग, निमा किती काम करशील? थोडी विश्रांती घे'.

''अग आई! तुझं तरी वय आहे कां? सकाळ पासून संध्याकाळपर्यंत तुझे हात सतत चालूच असतात, मी थोडी मदत केली तर काय बिघडलं?'' असे दोघींचे प्रेमसंवाद चालत. मधूनच आई निमाच्या लग्नाचा विषय काढी.

'अगं आई एवढी घाई कां?'

'अगं पोरी तू एकदा सुस्थळी पडलीस की मी डोळे मिटायला मोकळी!'

हे शब्द ऐकले की निर्मलाच्या मनाची कालवाकालव होई. आपल्या आईचे कष्ट कमी केले पाहिजेत तिला सुखात ठेवले पाहिजे असे तिचे मन तिला बजावत असे.

असेच दिवस जात होते. आणि एक दिवस राधाबाईंना दोन बोटांमध्ये पांढरा डाग

दिसला. त्यांच्या मनात चर्र झाले. आपल्या नशिबात काय लिहीले आहे? ह्या विचाराने त्या कासावीस झाल्या. आपल्या ह्या डागाने काही विपरीत तर घडणार नाही ना? ह्या विचारानें त्यांची झोप उडाली.

इकडे निर्मला व निरंजन या प्रेमी जीवांचे दिवस फुलपाखरासारखे चालले होते. निरंजनला ती मन देवून बसली होती. दोघांनी परस्परांच्या जीवनात एकरुप होण्याच्या आणाभाका घेतल्या होत्या, आपल्या सुखी संसाराची स्वप्ने रंगवली होती. एकदिवस निरंजनने 'आपण लवकर विवाहबद्ध होऊ या' असा प्रस्ताव मांडला.

एक दिवस मूड पाहून निर्मलाने आईकडे निरंजनचा विषय काढला. त्याच्या संबंधीची सविस्तर माहिती आईला सांगितली. 'आई, त्याने मला लग्नाची मागणी घातली आहे'.

तिचे शब्द ऐकून आई कावरी बावरी झाली. तिने आपल्या बोटांकडे पाहिले. त्या डागाचा आकार वाढला होता. तिने आपल्या मुलीला याबाबत सांगितले. निर्मला म्हणाली, 'अगं आई काळजी करण्याचे बिलकूल कारण नाही. हा तर त्वचेचा रोग आहे. सायन्स एवढे पुढे गेलं आहे औषधाने तो बरा होईल,' 'पेंडसे कुटुंब उच्चशिक्षित आहे, सुसंस्कृत आहे'. अशी तिने आईची समजूत घातली. आईने एक व्यथित दृष्टीक्षेप मुलीकडे टाकला आणि ती झोपण्यासाठीं आत निघून गेली.

नोकरीमध्ये स्थिरस्थावर झाल्यावर निरंजनच्या आईवडिलांनी निर्मलाच्या आईची भेट घेण्याचे ठरविले. निरंजन आपल्या आईवडिलांसह आपल्या घरी येणार म्हणून राधाबाईंना आनंद झाला. पण मनात शंकेची पाल चुकचुकत होतीच. त्यांनी उत्साहाने ओल्या नारळाच्या करंज्या आणि पोहे असा बेत केला. ठरल्यावेळी निरंजन आपल्या पालकाबरोबर निर्मलाच्या घरी आला. राधाबाईंनी सर्वांचे हसतमुखाने स्वागत केले. उर्मिलाबाईंना निर्मला सून म्हणून खूपच आवडली. गप्पा मारत असतांना निरंजनच्या आईने राधाबाईंच्या हातावरील पांढरा डाग पाहिला आणि त्यांचा गप्पांचा ओघ कमी झाला, चेहरा गंभीर झाला. त्यानंतर मात्र जुजबी गप्पा मारून त्यांनी घरचा रस्ता धरला.

पुढे दोन दिवस निरंजन ऑफिसमध्ये निर्मलाचे तोंड चुकवत होता. एक दिवस निर्मला म्हणाली, 'चल निरंजन आज माझा कॉफी प्यायचा मूड आहे'.

'माझी तब्येत ठीक नाही. तू दुसऱ्या कोणाबरोबर जाऊन कॉफी पिवून ये' असे उत्तर देवून तो निघून गेला.

निर्मलाला त्याच्या वागण्यातला फरक जाणवत होता. कदाचित कामाच्या ताणामुळें तो असा वागत असेल अशी तिने मनाची समजूत घातली. एक दिवस संध्याकाळी निरंजनने फोन केला, 'आज ऑफिस सुटल्यावर आपण भेटू'.

साहजिकच निर्मलाला आनंद झाला. जवळ-जवळ आठ दिवसांनी ती त्याला एकांतात भेटणार होती. ती ऑफिस सुटण्याची आतुरतेने वाट पहात होती. जरा लौकरच काम संपवून ती निरंजनच्या केबिनपाशी आली. निरंजनही आवरा आवर करून तिच्यापाठोपाठ केबीनमधून बाहेर पडला. जवळच्या कॉफीहाऊसमध्यें कॉफी पिण्यासाठीं समोरासमोर बसले. बराच वेळ निरंजन गप्प होता. न राहवून निर्मलाने विचारले, 'निरंजन तुला झाले तरी काय? तुझी तब्येत बरी नाही का?'

निरंजन उत्तरला, 'नाही ग! माझी तब्येत ठीक आहे पण माझ्या मनातलं तुला कसं सांगू हेच उमजत नाही'.

निर्मलाला काहीच बोध झाला नाही. ती त्याच्या चेहऱ्याकडे पाहतच राहिली. 'बोल, तुझ्या मनात काय आहे ते मनमोकळेपणानं सांग. माझी ऐकण्याची तयारी आहे'.

'निमा, आपले लग्न होऊ शकणार नाही' हे शब्द ऐकताच ती चक्रावून गेली.

'का आमचे काही चुकले का?' दु:खित होऊन निर्मलाने विचारले.

'नाही तुमचे काही चुकले नाही. मी तुझ्यावर प्रेम केलं. तुला लग्नाची मागणी घातली हे माझेच चुकले'

तुझ्या आईच्या हातावरील पांढरा डाग पाहून माझ्या आईने आपल्या लग्नाला नकार दिला आहे.

यावर निर्मला म्हणाली, 'अरे कोड हा आजार नाही, रोग नाही, त्यामुळे कोणाचं नुकसान होत नाही फक्त इतरापेक्षा दिसण्यात वेगळपण येते इतकेच'.

पण हा आनुवंशिक रोग आहे. कदाचित हा दोष आपल्या मुलांमध्येही येऊ शकेल आणि हेच आम्हाला नको आहे'.

त्याचे उत्तर ऐकून निर्मला म्हणाली, आज माझ्या आईला कोड आहे म्हणून तू मला नाकारतोस पण दुर्दैवाने तुमच्यापैकी कोणाला कोड असतं तर काय केलं असतस?'

ह्या प्रश्नाचे उत्तर निरंजनकडे नव्हते. तो निर्विकार बसून राहिला. समोर असलेल्या

कॉफीचे घोट घशात उतरवून ती उठली. आणि मागे न पाहता घरचा रस्ता धरला. पुन्हा निरंजनचे तोंड पाहायचे नाही हे ठरवूनच.

घराच्या दाराशी तिची आई तिची वाट पहात बसली होती. तिला पाहताच तिला भरून आले. पण तिने स्वत:ला सावरले पटकन् कपडे बदलून स्वयंपाकघरात गेली. आईच्या आवडीचे भाजणीचे थालीपीठ लावले. गरम गरम थालीपीठ आईला आग्रहाने खाऊ घातले.

यापुढे आई हेच आपलं सर्वस्व आणि आईसाठी आपण जगायचं हे तिने ठरवून टाकले.

दुसरे दिवशी राधाबाई पोळ्या करायला गेल्या तेव्हा त्यांना वेगळाच अनुभव आला. 'उद्यापासून आम्हाला पोळ्या नकोत, आज तुमचा पगार घेऊन जा' असे सुनावले गेले. राधाबाईंना ह्या गोष्टीचे कारण समजले. पुढच्या घरी त्या पोळ्या करण्यासाठी दबकतच गेल्या. त्यांनी आपल्या डागाबद्दलची माहिती सांगून आपले मन हलके केले. त्या बाई म्हणाल्या, 'काही हरकत नाही, तो काही संसर्गजन्य रोग नाही. ह्यात तुमचा काहीच दोष नाही. तुम्ही नेहमीप्रमाणे आमचे काम कोणतीही शंका न आणता करा'. दोन्हीकडील परस्पर विरोधी अनुभव त्यांना आले.

निर्मलाने चार दिवस रजा घेतली. दोन दिवस ती सैरभैर होती, अस्वस्थ होती. निरंजनला ती विसरु शकत नव्हती. निकाराने ती आठवणी पुसण्याचा प्रयत्न करत होती. तिने ऑफिसमध्ये पोस्टाद्वारे राजिनामा पाठवून दिला, पांढरे डाग असलेल्या लोकांसाठी कार्य करायचे हे मनाशी ठरवून.

तिने 'स्नेहमंदिर' नावाची संस्था सुरु केली. अनेक मोठ्या मनाच्या लोकांनी तिला सहकार्य केले. या संस्थेमध्ये समाजातील उपेक्षित लोकांसाठी वेगवगळे कोर्स सुरू केले की ज्यायोगे त्या व्यक्ती आपल्या पायावर उभे राहू शकतील.

समाजाने दुर्लक्षिलेल्या अनेक व्यक्ती ह्या संस्थेमध्ये एकत्र आल्या. काहींना कोड आहे म्हणून लग्नासाठी नाकारले होते, तर काही व्यक्तींना चहा दिलेली कपबशी धुवायला सांगून अपमानित केले गेले होते. काही जण तर आत्महत्येपर्यंत पोचले होते. अशा व्यक्तींना एकत्र करून निर्मलाने त्यांची समजूत घातली.

समाजामध्ये मधुमेह, टी.बी., हृदयरोग हे रोग आनुवंशिक आहेत त्यांचा समाज बाऊ करत नाही. मग अंगावरचे पांढरे रोग पाहून माणूस का दचकतो? अंध, अपंग

व्यक्ती जीवन आनंदाने जगतात मग अंगावर पांढरे डाग आहेत म्हणून कचरण्याचे काहीच कारण नाही. त्वचेवर डाग असले तर इतर अवयव धडधाकट आहेत ना? तेव्हा हे व्यंग विसरून समाजात उजळ माथ्याने वावरायला हवे. समाज बदलायला तयार नाही तर आपण दु:खी का व्हायचे? आपल्या अंगी असलेल्या कलागुणांचा विकास करून आपले जीवन मानाने जगायचे. अशा प्रकारे योग्य उपदेश करून त्यांच्या जीवनाला योग्य दिशा दिली. अनेक मुलींना योग्य वर शोधून त्यांचा संसार थाटून दिला. स्वत: आयुष्यभर वाळवंटात राहून दुसऱ्याच्या जीवनात हिरवळ निर्माण करण्यासाठी निर्मलाने किती मोठा त्याग केला होता.

**लेखनासाठी आवाहन**

कोड असणाऱ्या व्यक्तींनी त्यांच्या कुटुंबातील सभासदांनी व कोड नसणाऱ्या व्यक्तींनी आपल्या मौलिक लिखाणाने आम्हाला उपकृत करावे. लेखन खालील पत्त्यावर पाठवावे.

श्वेता असोसिएशन, C/o सहवास हॉस्पिटल, २६ सहवास सोसायटी,
कर्वेनगर, पुणे ५२.

# देणगीदारांना आवाहन

*श्वेताला पुण्याच्या मध्यवर्ती वस्तीत स्वत:चे पूर्ण वेळ कार्यालय असण्याची नितांत गरज आहे. भाडेतत्वावर एखादी जागा उपलब्ध होत असल्यास मासिक खर्च अंदाजे २५ ते ३० हजार रुपये आहे. उदार वाचक वर्गांनी आम्हाला ह्या प्रकल्पासाठी सढळ हस्ते मदत करावी ही विनंती आहे.*




सत्काराला उत्तर देताना डॉ. माया तुळपुळे




श्री. अभय फिरोदिया, खा. सुमित्रा महाजन,
डॉ. माया तुळपुळे, विश्वास देवल




डॉ. अनिल कुलकर्णी,
श्री. अभय फिरोदिया,
खा. सुमित्रा महाजन,
डॉ. माया तुळपुळे,
विश्वास देवल,
मृणालिनी चितळे,
रविंद्र देशपांडे